सहाय्यक पशुधन विकास अधिकारी या पदावर
जिल्हा परिषद सेवेमध्ये पुनःस्थापित करणे बाबत.
(श्री.वीर बापुसाहेब मारुती सहाय्यक पशुधन
विकास अधिकारी पशुवैदयकीय दवाखाना
कोरडगांव ता.पाथर्डी पं.स पाथर्डी)

अहिल्यानगर जिल्हा परिषद
पशुसंवर्धन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक पसं/आस्था-१/६७९/२०२६
दिनांक स्वाक्षरी खाली नमुद केल्याप्रमाणे

संदर्भ १. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.निप्रआ-११२२/प्र.क्र.०९/विचौ-२ दिनांक २२/०४/२०२५

२. इकडील निलंबन आदेश जि प जा.क्र.पसं/आस्था-१/२४२/२०२६ दि.०६/०५/२०२६

३. इकडील शुध्दीपत्रक जा.क्र.पसं/आस्था-१/३४५/२०२६ दिनांक ०३/०६/२०२६

श्री. वीर बापुसाहेब मारुती सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पशुवैदयकीय दवाखाना कोरडगांव ता.पाथर्डी पं.स पाथर्डी येथे कार्यरत असताना कर्तव्यात कसुन केल्याने संदर्भ क्र.०२ अन्वये त्यांना जिल्हा परिषद सेवेतुन निलंबीत करणेत आले होते. श्री. वीर बापुसाहेब मारुती सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांचा सेवानिलंबन कालावधी ३ महिन्यापेक्षा जास्त झालेला आहे. श्री.वीर सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांचे विरुध्द दोषारोप पत्र बजावणे प्रस्तावित आहे.

सबब संदर्भ-१ मधील शासन निर्णयातील तरतुदी नुसार श्री. वीर यांना सेवा निलंबित होऊन तीन महिन्यापेक्षा अधिक कालावधी झालेला असल्याने, श्री.वीर बापुसाहेब मारुती सहाय्यक पशुधन विकास अधिकारी याना संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयातील तरतुदीस व दोषारोप पत्रानुसार पुढील शिक्षेच्या कार्यवाहीस अधिन राहुन, श्री.वीर बापुसाहेब मारुती सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांना जिल्हा परिषद सेवेत पुनस्थापित करणेत येवुन त्यांना पशुवैदयकीय दवाखाना घोटण ता.शेवगाव येथे पशुधन विकास अधिकारी या पदावर पदस्थापना देण्यात येत आहे. आणखी असाही आदेश देत आहे की, श्री. वीर बापुसाहेब मारुती सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांचे निलंबन कालावधीचा निर्णय शिस्तभंग कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.

श्री. वीर बापुसाहेब मारुती सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांनी दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे. सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202611041100036 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 04-11-2026 14:01:39

आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. वीर बापुसाहेब मारुती सहाय्यक पशुधन विकास अधिकारी

व्दारा व प्रत :- गट विकास अधिकारी,पंचायत समिती पाथर्डी

२/- सदरचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अहवाल सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी पंचायत समिती ---शेवगाव----------

प्रत :- तालुका पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय अधिकारी पंचायत समिती ---शेवगाव----------

२/- श्री.वीर बापुसाहेब मारुती सहाय्यक पशुधन विकास अधिकार हे हजर झाल्यानंतर हजर अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी पंचायत समिती पारनेर यांना माहितीसाठी.

आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर